कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या बदल्या व नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-१११७/(४८३/२०१७)/आ.(वर्ग-१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
तारीख: १६ फेब्रुवारी, २०१८

<u>शासन आदेश</u> :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने नियुक्त्या / पदस्थापनेत बदल खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे:-

अ.क्र	अधिकाऱ्यांचे नाव (सर्वश्री.)	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.शि.ना.बोलभट	कार्यकारी अभियंता, नीरा देवधर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता.भोर, जि.पुणे.	कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार (विनंतीनुसार)
२.	श्री.पल्लवी कौ.जगताप	कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे.	कार्यकारी अभियंता व उपसंचालक पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार (विनंतीनुसार)
३.	श्री.उ.वि.सिध्दमल	कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि.सातारा.	कार्यकारी अभियंता, नीरा देवधर प्रकल्प विभाग, सांगवी (भाटघर), ता.भोर, जि.पुणे.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार (विनंतीनुसार)
४.	श्री.रा.पां.डवरी	उप अधीक्षक अभियंता, दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, ओरोस.	कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभागीय पथक, अंबडपाल.	बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार.

२. श्रीमती जगताप तसेच सर्वश्री.सिध्दमल व डवरी यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर अन्य अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

३. संबंधित वरिष्ठ अधिका-यांना कळविण्यात येते की, सदर नियुक्ती/पदस्थापना दिलेल्या अधिका-यास आपल्या नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधीत अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

४. संबंधीत अधिकाऱ्यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०२१६१७४३३०९२२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.02.16 17:46:40 +05'30'

(सु.गं.गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण विकास महामंडळ, औरंगाबाद.
४. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
५. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.

६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
७. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
८. खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
९. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१०. संबंधीत अधिकारी.
११. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सह सचिव (सेवा) / अवर सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१४. कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.